नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १ Issue - 1 | वार - मंगळवार दि. २६ मे २०२६ Blow- Tuesday Date 26 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## आंबेनळी घाटात भीषण अपघात; दरीत स्कॉर्पिओ कोसळून ८ तरुणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड : रायगड आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील धोकादायक आंबेनळी घाटात रविवारी पहाटे भीषण अपघात घडला. प्रवाशांनी भरलेली एक स्कॉर्पिओ जिप अनियंत्रित होऊन तब्बल ५०० ते ७०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना समोर आली आहे. या भीषण दुर्घटनेत वाहनातील सर्व ८ तरुणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून, मृत सर्वजण सातारा जिल्ह्यातील



कोरेगाव तालुक्यातील आसगाव गावचे रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे.

विशेष म्हणजे, २०१८ मध्ये दापोली कोकण कृषी विद्यापीठाच्या बसला ज्या ठिकाणी भीषण अपघात झाला होता, त्याच परिसरात हा अपघात घडल्याने पुन्हा एकदा आंबेनळी घाटाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात रविवारी पहाटे सुमारे २:४५ वाजता घडला. आसगाव येथील आठ तरुण स्कॉर्पिओ जिपमधून प्रवास करत होते. आंबेनळी घाटातील एका तीव्र आणि धोकादायक वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गाडी थेट दरीत कोसळली. घाटातील अंधार, खोल दरी आणि कठीण भौगोलिक परिस्थितीमुळे अपघात अधिक भीषण होता. वाहन दरीत कोसळल्यानंतर मोठा आवाज झाला. मात्र दरी अत्यंत खोल असल्याने वाहनापर्यंत पोहोचणे आणि परिस्थितीचा अंदाज घेणे सुरुवातीला कठीण झाले.

अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस, स्थानिक प्रशासन आणि विविध बचाव पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. दरीची खोली ५०० ते ७०० फूट असल्याने बचाव आणि शोधमोहीम राबवताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

महाबळेश्वर रेस्क्यू टीम, प्रतापगड रेस्क्यू टीम, सिस्केप महाड-पोलादपूर, आपदा मित्र तसेच स्थानिक स्वयंसेवक आणि मदत पथके घटनास्थळी कार्यरत आहेत. बचाव पथकाने दरीत उतरून शोधमोहीम सुरू केली असून, आतापर्यंत दोन मृतदेह बाहेर काढण्यात यश आले आहे. उर्वरित मृतदेहांचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

या दुर्घटनेची माहिती समोर येताच आसगाव गावासह संपूर्ण कोरेगाव तालुक्यात शोककळा पसरली आहे. एका गावातील आठ तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघाताचे नेमके कारण काय होते, याचा तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू करण्यात आला असून, पुढील चौकशीनंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, आंबेनळी घाटातील धोकादायक वळणे, खोल दऱ्या आणि वारंवार घडणारे अपघात लक्षात घेता या मार्गावरील सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

# पेट्रोल-डिझेल पुन्हा महागलं! सलग चौथ्यांदा झाली दरवाढ

## दोन आठवड्यांत तब्बल ७.५० रुपयांहून अधिक वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशभरातील वाहनधारकांना पुन्हा एकदा महागाईचा फटका बसला आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये ११ दिवसांत चौथ्यांदा वाढ करण्यात आली आहे. आज २५ मे २०२६ रोजी सकाळी इंधनाच्या दरात वाढ जाहीर झाली. दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नईसह अनेक प्रमुख शहरांमध्ये इंधनाचे दर आणखी वाढले आहेत. नव्या दरांची अंमलबजावणी आज सकाळी ६ वाजल्यापासून करण्यात आली.



यामुळे खासगी वाहनचालकांसह वाहतूक क्षेत्रावरही अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. काही शहरांमध्ये पेट्रोलच्या दरात ३ रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली असून डिझेलही महागले आहे. राजधानी दिल्लीत पेट्रोल प्रतिलिटर २.६१ रुपयांनी वाढून १०२.१२ रुपये झाले आहे. तर डिझेलच्या (ऊळशीशश्र) दरात २.७१ रुपयांची वाढ झाल्याने ते ९५.२० रुपये प्रतिलिटरवर पोहोचले आहे. त्यामुळे वाहनाची टाकी भरताना ग्राहकांना आता अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

प्रमुख शहरांतील आजचे पेट्रोल-डिझेल दर

दिल्ली : पेट्रोल १०२.१२ रुपये, डिझेल ९५.२० रुपये प्रतिलिटर

मुंबई : पेट्रोल १११.२१ रुपये, डिझेल ९७.८३ रुपये प्रतिलिटर

कोलकाता : पेट्रोल ११३.४७ रुपये, डिझेल ९९.८२ रुपये प्रतिलिटर

चेन्नई : पेट्रोल १०७.७७ रुपये, डिझेल ९९.५५ रुपये प्रतिलिटर

बेंगळुरू : पेट्रोल ११०.६१ रुपये, डिझेल ९८.५४ रुपये प्रतिलिटर

नोएडा : पेट्रोल १०१.९२ रुपये, डिझेल ९५.३७ रुपये प्रतिलिटर

गुरुग्राम : पेट्रोल १०२.६९ रुपये, डिझेल ९५.३६ रुपये प्रतिलिटर

चंदीगड : पेट्रोल १०१.५४ रुपये, डिझेल ८९.४७ रुपये प्रतिलिटर

लखनऊ : पेट्रोल १०१.८९ रुपये, डिझेल ९५.३६ रुपये प्रतिलिटर

पटणा : पेट्रोल ११३.५४ रुपये, डिझेल ९९.५४ रुपये प्रतिलिटर

गेल्या दोन आठवड्यांत इंधन दरवाढीचा हा चौथा निर्णय आहे. १५ मे रोजी तब्बल चार वर्षांनंतर पेट्रोल-डिझेलच्या दरात प्रतिलिटर ३ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली होती. त्यानंतर १९ मे आणि २३ मे रोजीही जवळपास ९० पैशांची वाढ करण्यात आली.

१५ मेपासून सुरू झालेल्या या दरवाढीच्या मालिकेमुळे आतापर्यंत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये एकूण ७.५० रुपयांपेक्षा अधिक वाढ झाली आहे. परिणामी सर्वसामान्यांच्या खिशावरील भार वाढण्याची शक्यता असून वाहतूक खर्च वाढल्याने इतर वस्तूंच्या किमतींवरही परिणाम होऊ शकतो.

## चारित्र्याच्या संशयावरून बार्शीत पत्नीची निर्घृण हत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील बार्शीत धक्कादायक घटना घडली आहे. दिवसाढवळ्या पत्नीची चाकूने वार करत हत्या केल्याची घटना घडली आहे. हत्या करून आरोपी पती स्वत:हून पोलिस ठाण्यात हजर झाला आहे. बार्शी शहराजवळील बार्शी-परंडा रोडवर आज दुपारी ही घटना घडली आहे. या घटनेनं बार्शी शहरात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, कौटुंबिक करणातून पती-पत्नीमध्ये वाद झाला होता. त्यानंतर आरोपी ऋषिकेश पाटील याने आपल्या पत्नी धनश्री पाटील हिची भररस्त्यात चाकूने निर्घृण हत्या केली. वाद चिघळताच संतापाच्या भरात ऋषिकेशने पत्नीवर चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धनश्री पाटील हिचा जागीच मृत्यू झाला. ऋषिकेश आणि धनश्री हे दोघेही खाजगी बँकेमध्ये काम करत होते. याप्रकरणी बार्शी पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून आरोपी ऋषिकेश पोलिसांच्या ताब्यात आहे.

सूत्रांच्या माहिती नुसार चारित्र्याच्या संश्यातून आरोपी ऋषिकेशने हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे ऋषिकेश आणि धनश्री यांचा काही महिन्यापूर्वीच प्रेमविवाह झाला होता.






कल्याणमधील टिटवाळ्याजवळील आंबिवली परिसरातून एक अत्यंत सुन्न करणारी आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या तरुणाने आपल्या २२ वर्षांच्या प्रेयसीची अत्यंत क्रूरपणे मारहाण करत हत्या केली आहे. रुक्सार अन्सारी असं या दुर्दैवी मृत तरुणीचं नाव असून, सतीश उर्फ गुड्डू वाघे असं हत्या करणाऱ्या नराधम आरोपीचं नाव आहे. चारित्र्यावर संशय घेत आरोपीने रुक्सारला लाथाबुक्क्यांनी आणि काठीने बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता घरातला टीव्ही आणि पाण्याने भरलेला तांब्याचा हंडा तिच्या डोक्यात मारून तिला रक्ताच्या थारोळ्यात पाडलं. या घटनेनंतर गंभीर जखमी रुक्सारला घेऊन तिचे नातेवाईक आधी टिटवाळा आणि नंतर उल्हासनगरच्या सेंट्रल रुग्णालयात पळाले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं. संतापजनक बाब म्हणजे हत्येनंतर रुग्णालयाबाहेर फिरणाऱ्या या नराधम आरोपीला मुलीच्या नातेवाईकांनी पकडून चांगलाच चोप दिला आणि पोलिसांच्या स्वाधीन केलं आहे. सध्या याप्रकरणी टिटवाळा तालुका पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

## मुंबई-आग्रा महामार्गावर भीषण अपघात, पाच ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धुळे : मुंबई-आग्रा महामार्गावर भीषण अपघात होऊन पाच जण ठार झाल्याची घटना घडली आहे. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील लळिंग घाटात रविवारी पहाटे ही भीषण तिहेरी अपघाताची घटना घडली आहे. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला असून १० ते १२ जण गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. रेतीने भरलेल्या डंपरने एका वाहनाला धडक दिली, याचवेळी मागून आलेली ट्रॅव्हल्स वाहन जोरदार धडकल्याने हा तिहेरी अपघात घडला. या अपघातानंतर घाट परिसरात एकच खळबळ उडाली असून महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, लळिंग घाटातून भरधाव वेगाने जाणाऱ्या रेतीच्या डंपरवरील चालकाचे नियंत्रण सुटले. यामुळे डंपर विरुद्ध बाजूला गेला आणि समोरून जाणाऱ्या एका वाहनावर धडकला. याचवेळी मालेगावकडून आलेले ट्रॅव्हल्स वाहन अपघातग्रस्त वाहनांवर जोरदार धडकले. ही धडक इतकी भीषण होती की वाहनांचा अक्षरशः चुराडा झालाय.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, महामार्ग पोलीस, तसेच टोल नाक्यावरील मदत पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना बाहेर काढण्यासाठी मोठे बचावकार्य राबविण्यात आले. गंभीर जखमींना उपचारासाठी धुळे येथील शासकीय व खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. मृतांची आणि जखमींची ओळख पटविण्याचे काम सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, अपघातस्थळी मदतकार्य करत असताना लळिंग टोल नाक्यावरील काही कर्मचाऱ्यांचाही अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे संतप्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी लळिंग टोल नाक्यावर आंदोलन सुरू करत टोल वसुली बंद पाडली. आम्हाला कोणतीही सुरक्षा नाही, विमा संरक्षण नाही, तरीही आम्ही जीव धोक्यात घालून अपघातग्रस्तांना मदत करतो.आमच्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे.

### पाण्याचं तीन टप्प्यात होणार ऑडिट

### महसूलमंत्री बावनकुळेंचा मोठा निर्णय

# देशातील पहिला ‘पाण्याचा सातबारा’ महाराष्ट्रात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर ’पाण्याचा सातबारा’ देशात प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरु करण्यात आले आहे. विकसित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येणार आहे. यासाठी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाची तयारी सुरु केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत आज मंत्रालयातील बैठकीत यावर सविस्तर चर्चा केली.



जलव्यवस्थापन करणाऱ्या अक्केरियम या संस्थेने यासाठी ’वॉटर ऑडिट’ आणि ’बॅलन्सशीट’ची संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. सध्या सर्वत्र जमिनीच्या नोंदीसाठी ’सातबारा’ उतारा अस्तित्वात आहे, मात्र पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली नाही. पाण्याला जागतिक स्तरावर जो मान आणि दर्जा मिळायला हवा, तो सध्या मिळत नाही. एकदा पाण्याचे ऑडीट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाईल. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने ’ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट’च्या धर्तीवर हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी अक्केरियमचे प्रमुख डॉ. सुब्रमन्यम कंसूर, जलाभ्यासक डॉ. अविनाश कदम आणि उदय नायर यांनी एकत्रितपणे ’वॉटर अकाऊंटिंग फ्रेमवर्क’ आणि ’वॉटर बॅलन्सशीट’ची अद्ययावत संकल्पना विकसित केली आहे. या अंतर्गत पाण्याचे तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, त्याचे दरवर्षी वर्गीकरण केले जाईल. या प्रणालीमुळे ग्राम पंचायत किंवा पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा साठा, आवक, जावक आणि शिल्लक पाणी याचा पारदर्शक ताळेबंद ठेवता येईल.



या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे केवळ पाण्याचे मोजमाप होणार नाही, तर पाण्याचे संवर्धन करणाऱ्यांना ’अक्काक्रेडिट्स’ च्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे ग्रामीण भागात पाण्याचा वापर अधिक जबाबदारीने आणि पारदर्शकपणे होईल, व भविष्यात एक मोठी ’वॉटर इकॉनॉमी’ उभी राहण्यास मदत मिळेल. महाराष्ट्र राज्य हा प्रयोग राबविणारे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

## नीट पेपरफुटी प्रकरणी प्रा. मोटेगावकरच्या नातेवाईक सीबीआयच्या रडारवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : नीट पेपरफुटी प्रकरणातील तपासाला आता अधिक वेग आला आहे. आरोपी असलेल्या शिवराज मोटेगावकर यांच्या नातेवाईकांची चौकशी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाशी संबंधित अधिक माहिती गोळा करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. अशातच आता लातूरमधून या प्रकरणी महत्वाची अपडेट समोर येत आहे. पाचवा डॉक्टरदेखील सीबीआयच्या रडारवर असून, त्याची चौकशी सुरु असल्याची माहिती मिळत आहे.

लातूरमधील प्रसिद्ध प्रसूती रोग आणि आयव्हीएफ तज्ज्ञ डॉक्टर आता सीबीआयच्या रडारवर आले आहेत. सीबीआयच्या पथकाने संबंधित डॉक्टरांना चौकशीसाठी लातूरमधील अस्थायी कार्यालयात आणल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात लातूरमधील पाचव्या डॉक्टरांची चौकशी सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

यापूर्वी डॉ. मनोज शिरुरे यांच्या चौकशीनंतर एका बालरोग तज्ज्ञ डॉक्टरांची, त्यांच्या नातेवाईक असलेल्या दुसऱ्या डॉक्टरांची तसेच आणखी एका बालरोग तज्ज्ञ डॉक्टरांची चौकशी करण्यात आली होती. आता त्या पाठोपाठ पाचव्या डॉक्टरांची चौकशी सुरू झाली आहे.

सीबीआयच्या पथकाने आज दिवसभर शहरातील विविध भागात माहिती संकलन केले. काही हॉस्टेलवर जाऊन विद्यार्थ्यांचीही चौकशी करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

## संपादकीय....

# आर्थिक दबाव

गेल्या १२ दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात चार वेळा वाढ झाली आहे. परिस्थिती अशी आहे की, सर्वसामान्य माणूस महागाईच्या परिणामामुळे त्रस्त आहे आणि या वाढत्या किमती नियंत्रणात येतील अशी रोज आशा करत आहे.दरवाढीमुळे आधीच महागाईचा सामना करणाऱ्या कुटुंबांवर आणखी दबाव येईल. डिझेलच्या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढेल, ज्याचा परिणाम दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमतींवर होईल. तज्ज्ञांच्या मते, पेट्रोल आणि डिझेलच्या किरकोळ दरात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. डॉलरच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन आणि आंतरराष्ट्रीय तेल दरांमधील वाढता कल यामुळे देशांतर्गत तेल विपणन कंपन्यांवर आर्थिक दबाव वाढत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरांवर सरकारचे नियंत्रण नसते; ते तेल कंपन्यांकडून ठरवले जाते. पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. तज्ज्ञांच्या मते, राज्य सरकारांची इच्छा असल्यास, ते पेट्रोल आणि डिझेलवरील व्हॅट कमी करून सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा देऊ शकतात. अनेक राज्ये ३० टक्क्यांपेक्षा जास्त व्हॅट आकारतात आणि तो कमी केला जाऊ शकतो. पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क आणि व्हॅट हे केंद्र आणि राज्य सरकारांसाठी महसुलाचे प्रमुख स्रोत आहेत. देशभरातील वाहनधारकांना पुन्हा एकदा महागाईचा फटका बसला आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये ११ दिवसांत चौथ्यांदा वाढ करण्यात आली आहे. आज २५ मे २०२६ रोजी सकाळी इंधनाच्या दरात वाढ जाहीर झाली. दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नईसह अनेक प्रमुख शहरांमध्ये इंधनाचे दर आणखी वाढले आहेत. गेल्या दोन आठवड्यांत इंधन दरवाढीचा हा चौथा निर्णय आहे. १५ मे रोजी तब्बल चार वर्षांनंतर पेट्रोल-डिझेलच्या दरात प्रतिलिटर ३ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली होती. त्यानंतर १९ मे आणि २३ मे रोजीही जवळपास ९० पैशांची वाढ करण्यात आली. १५ मेपासून सुरू झालेल्या या दरवाढीच्या मालिकेमुळे आतापर्यंत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये एकूण ७.५० रुपयांपेक्षा अधिक वाढ झाली आहे. परिणामी सर्वसामान्यांच्या खिशावरील भार वाढण्याची शक्यता असून वाहतूक खर्च वाढल्याने इतर वस्तूंच्या किमतीं-वरही परिणाम होऊ शकतो.

# कल्पनेवर विश्वास न ठेवणारा ग्रथंपाल : डॉ. किशोर पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आमचे मित्र, तत्वज्ञ व सहकारी डॉ. किशोर पाटील यांचा आज ६७ वा वाढदिवस. त्यानिमित्त पाटील यानां वाढदिवसाच्या मंगलमय शुभेच्छा. डॉ किशोर पाटील अखिल भारतिय कृषि विज्ञान परिषदेचे उच्चपदस्त अधिकारी होते. सेवेच्या शेवटी पुणे येथिल कृषि महाविद्यालयात त्यांची विशेष 'ग्रंथालयविषयातील प्रोफेसर पदावर सेवानिवृत्त झाले. त्यांचा जीवनप्रवास धुळीतून युगंधराकडे... जाताना दिसत आहे.

डॉ किशोर पाटील यांचा जन्म : मौजे चहांद, तालुका राळेंगाव, जिल्हा यवतमाळ येथे. ते उच्च विद्याविभूषित आहे. चहांद गाव ते पुणे प्रवास अधिक खडतर, अद्भूत व मनोरंजक असा आहे. धम्मविचारांनी झपाटलेला तरून. त्रेलोक्य बौद्ध महासंघाच्या मूशीतून तयार झालेले. बौद्ध विचारवंत लोकमित्र यांच्या प्रेरणेनी बौद्ध धम्म चळवळीत उडी घेतली. बुद्ध धम्म अंगीकारला. धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी पेटून उठले. धम्माच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. कर्मकांड नाकारले विज्ञानाचा वसा घेतला धर्म झिडकारून बाबासाहेबांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांची कास धरली. प्रतिकूल परिस्थितून वाटचाल केली. विद्यार्थी दशेत कमालीची उपासमार होऊनही शिक्षणाची जिद्द सोडली नाही. स्वतःचा स्वार्थ पाहिला नाही. सुखाकडे वा भाकरीकडे पाहिले नाही. तहान-भुकेची तमा बाळगली नाही. वास्तवाचे चटके सहन करत जीवनसन्मूख वृत्ती जोपासली. प्रकाशाला अभिमुख झालेला तरून आंबेडकर चळवळी माहित करून घेऊ लागला. अज्ञानातून कसे बाहेर पडायचे याचा ध्यास घेतला. त्यांच्या समाजजाणिवा प्रगल्भ होत गेल्या. ते सोशल झाले. खरा हाच काळ किशोर यांचा जडणघडणीचा होता. एक नवा माणूस घडण्यास प्रारंभ झाला होता. एक नवी बौद्धसंस्कृती घडवू पहात होता. ग्रंथालयाची मौलिकता, ज्ञान, विज्ञान, सापेक्षतावाद, विज्ञान, मानवतावाद याचे गोष्टीचे सहज विवेचन करतात. त्यांचे विवेचनात दांडगा अनुभव व अफाट वाचन दिसून येते. त्यांच्या पक्का प्रोफेशनल ग्रंथपाल डोकावताना आढळतो. आचार, विचार आणि उच्चार याचे जाणीवपूर्वक विचारात घेऊन आपली मांडणी करतात. प्रकाशात येणे किंवा आणणे, यापेक्षा प्रकाशमान राहणे हे सर्वात चांगले याचा प्रत्यय येतो. त्यांच्या व्यक्तिमत्वाकडे पहाताच येतो.



पुणे स्टेशन येथिल बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ त्रिरत्न वाचनालय कम पुस्तक विक्री केंद्र होते. त्रिलोक्य बौद्ध महासंघाच्यावतीने हे केंद्र संचालित केले जायचे. तेथे किशोर धम्मसेवक म्हणून कार्यरत होते. दुकानात बसायचे पुस्तक विक्री करायचे. ग्रंथाची गोडी लागली. वाचन वाढले. एक बैठक तयार होऊ लागली. त्याला ध्यानधारणेची साथ लाभली. कमालीचे धार्मिक. धम्माचरण करणारे. धम्म जगला पाहिजे. अंगिकारले पाहिजे. धम्म पवित्र आहे. भगवान बुद्धाला अभिप्रेत असणारा धम्म म्हणजे माणसाच्या सत् प्रवृत्तीतून असा आहे. सद् भावना, सद् विवेक आणि सदाचार ही त्याची मुळ अंतरंग आहेत असे मानणा-यापैकी होते. एक परिशुद्ध माणूस तयार होऊ पहात होते. त्रिरत्न वाचनालयाच्या वतीने किशोर पाटील यांना १९८४ ला पुणे विद्यापीठात ग्रंथालय व माहिती विज्ञान पदवी परिक्षेला प्रवेश मिळाला. त्यावेळी आताचे बौद्धग्रंथाचे विक्रेते व समता सैनिक दलाचे प्रमूख धर्मानंद हे सहकारी होते. ते मदतनिस होते. डॉ किशोर हे आंबेडकर हौसिंग सोसायटी ते पुणे विद्यापीठ सायकलने प्रवास करत असत.

ग्रंथालय व माहिती शास्त्राचे नामवंत प्रोफेसर , ज्यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र वलय निर्माण केले, डॉ शां. ग. महाजन यांनी खरी अनेक विद्यार्थ्यांना दिशा दाखवली. नवा आशावाद जागवला. शिक्षण महत्वाचे असते. यासाठी सततचे वाचन अनिवार्य असते. मनन, चिंतन, वारंवारता व जिद्द या शिक्षणाच्या पाय-या आहेत. डॉ महाजन सरांमुळे कळले. त्याचप्रमाने किशोर यांना बौद्ध तत्वज्ञानाची वैचारिक बैठक असल्याने सर्व जटील प्रश्नांचे मूळ त्यांच्या अज्ञानात असतात. भगवान बुद्धाने तर ज्ञान म्हणजे प्रकाश असे म्हटले आहे. शोषणमुक्त व्हायचे असेल तर शिक्षण पाहिजे. दीनदलितांचे दुःख संपवायचे असेल शिक्षण हवंय. प्रबुध्द व्हायवा हवे. यासाठी शिक्षण डोळसपणे आत्मसात करणे गरजेचे आहे हे किशोर यांनी जाणले. त्यासाठी काहीकरून पदवीशिक्षण पूर्ण करायचे याचा ध्यास घेतला. नोकरी करतच शिक्षण पूर्ण कले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ त्यांचे आवडते विद्यापीठ राहिले आहे. बुद्ध फुले आंबेडकर त्यांचे आदर्श असून त्यांचा विचार सर्व सामान्य माणसापर्यतं पोहोचायला हवा. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला धम्म प्रत्येकांपर्यतं जायला हवा यासाठी विविध कार्यक्रमात त्यांचा क्रियाशील सहभाग असतो. विशेष म्हणजे किशोर तन मन धनाने धम्म चळवळीत आहेत. सर्व धम्माचारी व त्रेलोक्य कार्यकर्त्यांचे जाळे प्रभावी आहेत. तसेच सामाजिक व सास्कृतिक कार्यक्रमात हिरिरीने अर्थ सहाय्य करून योगदान देतात. नागविदर्भ असोशिएशनचे ते आजिव सभासद असून बरीच वर्षे संस्थेची सर्व धुरा सांभाळली आहे.

पुढे २००७ ला टिळक महाराष्ट्र विद्यापीठात किशोर पाटील यांनी ग्रथालय व माहिती विज्ञान क्षेत्रात पीएचड प्राप्त केली. 'Use of ICT in gricultural University Libraries of Western India : Critical Study' असा अभ्यास विषय होता. ग्रंथालय व माहिती तज्ञ डॉ म. भि. कोन्नूर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी संपादन केली.

अनेक राष्ट्रिय व आंतरराष्ट्रिय परिषदामधून शोधनिबंध सादर केले. ग्रंथालय व माहिती विज्ञान क्षेत्रातीलअनेक शासनमान्य अनेक निवड समित्यावर काम करण्यांचा त्यांचा दांडगा अनुभव आहे. सध्या ते सामाजिक व सांस्कृतिक कार्यात हिरीरीने सहभाग नोंदवतात. सामाजिक जाणीवा प्रगल्भ असल्याने त्यांना प्रत्येक गोष्ट करावीशी वाटते. प्रत्येक जण आपल्यासारखा उभा रहावा, घडावा व सामाजिक व सांस्कृतिक कार्यात योगदान द्यावे असे वाटते.

सामाजिक दृष्ट्या डॉ. किशोर यांनी माणुसकीच्याच संस्कृतीचा पुरस्कार केला आहे. इहवाद आणि विज्ञानवादालाच ते कवटाळले आहेत. या व्यतिरिक्त देव, दैववाद, पुनर्जन्म, कर्मकांड या सर्व गोष्टी काल्पनिक असून त्या केवळ भांडवलदाराच्या शोषणाची हत्यार आहेत असे ते मानतात. तसे ते वैयक्तिक देव, दैव, परलोक किंवा मंदिर यावर त्यांचा विश्वास नाही. ईहवाद हा गरिबाला कोणी लुटू नये. धर्म, देव, दैव या काल्पनिक साधनांच्या आधारे त्यांची पिळवणूक होऊ नये. हेच पाहतो. यामुळे डॉक्टर किशोर यांचा दैवीशक्तीवर, परमेश्वरावर, धर्मग्रंथावर, आत्म्यावर, कर्मकांडावर, अंधश्रद्धेवर त्यांचा विश्वास अजिबात नाही. ते पूर्णपणे धम्मवादी आहेत.

एवढा प्रदीर्घ शिक्षण व अनुभवानंतर डॉक्टर किशोर यांनी आपले कुटुंब समाज यांना दिशादर्शन करण्यासाठी स्वतःचे अनुभव कथन करावेत, लिहावेत. धर्म लक्षवेधी ठरत आहे धर्मग्रणी आल्याचे भासवत आहेत. मानवी मूल्यांची पडझड होत आहे. तेव्हा किशोर यांनी लेखन करावे. अशी आपेक्षा. तरुणांची तरुण इच्छाशक्ती जागृत ठेवण्यासाठी, धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी आपल्याला लिहावं लागेल. आपले शब्द समाजाचे भले करतील. माणूस म्हणून तुम्ही ऐटीत जरूर जगा. आयुष्य म्हणजे नेहमी पात्रता, प्रयत्न आणि परिस्थिती याचे मिश्रण असते. वैचारिक बांधिलकी व सामाजिक जाणीव म्हणून आंबेडकरांचे ऋण फेडता आले तर फेडा. बुद्ध फुले शाहू आंबेडकर तुमचे आदर्श व मेन्टार मानत आला आहात. परिस्थिती अक्राळ विक्राळ स्वरूप धारण करत आहे. ज्ञानवृद्धी होत आहे. सत्य स्वीकारणे कठीण जात आहे. तरूण सैरभैर आहेत. तेव्हा तरुणांना आपण मार्गदर्शन करावे वास्तव सांगावे हीच अपेक्षा.

महात्मा गांधीजी म्हणून खेड्याकडे जा खेड्यात राहा खेड्यात जीवन जगा. परंतु डॉ आंबेडकर म्हणत, खेड्यातला जो गाव गाडा आहे, व्यवस्था आहे, तो विषमताचा पुरस्कार करणारा आहे. जाती-धर्म याचा विचार केला जातो. तेव्हा खेड्याकडून शहराकडे चला.

तेथे रोजगार मिळेल. तेव्हा डॉ किशोर देखील या विचारांचा पाठपुरावा करावा असे त्यांना वाटते.

पुनश्य शुभेच्छा. आपणास उत्तम आरोग्य लाभो ही मंगल कामना....!!!

**- डॉ. डी. टी. गायकवाड,**
**माजी ग्रंथालय एवं सुचना अधिकारी,**
**केंद्रिय जल और विद्युत अनुसंधान**
**शाला, खडकवासला,**
**पुणे - ४११ ०२४.**
**मोबाईल : ९८६०५९१३०५**

# कळंब तालुका गटशिक्षणाधिकारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने संतोष माळी यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : येरमाळा बीटचे विस्तार अधिकारी तथा जिल्हा परिषद शिक्षण विभाग (योजना चे) उपशिक्षणाधिकारी सन्माननीय संतोष माळी यांची कळंब तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी पदी नियुक्ती झाल्याबद्दल राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने यांनी गटशिक्षण कार्यालयाकडून ओबीसी प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती बाबत सर्वांनी सकारात्मक विचार करून सर्व पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याचे आव्हान केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त मुख्याध्यापक श्री सी आर घाडगे सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त तहसील कर्मचारी टी जी माळी आणि कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक हरिभाऊ कुंभार, गोविंदपूर बीट च्या विस्ताराधिकारी श्रीमती मैनाबाई मुळे इत्यादी उपस्थित होते.

यावेळी विविध शिक्षक संघटनांच्या वतीने श्री संतोष माळी यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास राज्यस्तरीय महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री सोपान पवार यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले.यावेळी श्री संतोष भांडे, श्री अनिल हजारे, भडंगे आप्पा, श्री लक्ष्मण धावारे, श्री महेंद्र रणदिवे, प्रा विजय घोळवे सर, श्री भालेराव सर, श्री लिबराज सुरवसे सर,श्री ज्ञानेश्वर तोडकर सर, श्री. यानी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्री ज्योतीराम बप्पा कोरे, बाळासाहेब टोणगे, आवाड सर, श्री वाघमोडे सर, श्री निशिकांत आडसुळ, डॉ अशोक शिंपले सर, श्री बंडू ताटे, श्री सचिन डोरले यांच्या सह अनेकजण उपस्थित होते.

यावेळी विद्याभवन हायस्कूलचे शिक्षक श्री सोपान पवार यांना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संतोष भोजने यांनी तर आभार प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर तोडकर सर यांनी केले.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान त्यावेळी त्यांना भविष्यातील करिअरसाठी प्रेरणा मिळते : डॉ. बी. पी. रोंगे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये हे संपादन करतात अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केल्यामुळे त्यांना भविष्यातील करिअरसाठी योग्य ती प्रेरणा मिळण्यास मदत होते अशी प्रतिपादन श्री इंजिनिअरिंग कॉलेज गोपाळपूरचे संस्थापक सचिव डॉक्टर बीपी रोंगे यांनी केले ते काल मंगळवेढा येथील महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन अँड रुरल डेव्हलपमेंट सोसायटीच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभासाठी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून खासदार प्रणिती शिंदे, अँड भारत पवार, संजय कट्टे, यशोदा पुण्याची प्राध्यापक महादेव माळी डॉक्टर पुष्पा भोसले माजी केंद्रप्रमुख सुखदेव शिंदे संस्थेचे अध्यक्ष अँड दत्तात्रय खडतरे सचिव कविता खडतरे मुख्याध्यापक राजेंद्र नलावडे नंदकुमार मोरे शिवाजी कांबळे लक्ष्मण गळवे संभाजी सलगर अर्चना सलगर सचिव कोळेकर भारत रायबाग अंजली जोशी बोराळे ची माजी सरपंच कुमार धनवे उज्वला शिंदे आशाबाई खडतरे रोहिदास सपकाळे आणि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉक्टर बीपी रोम यांनी उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करताना सांगितले की दहावी बारावीच्या परीक्षेतील विषयानंतर करिअर साठी काय करावे याबाबतचे मार्गदर्शन केले व समाजात वेगवेगळ्या प्रकारचे समाज उपयोगी कार्यक्रम ठेवून सर्वच घटकांना न्याय देण्याची भूमिका संस्थेचे माध्यमांवर पार पाडून हे विद्यार्थी ग्रामीण भागातून पुढे येतात ती नक्कीच हुशार असावं तर त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. त्याचबरोबर त्यांना एक संपादन केल्यानंतर त्यांचा गौरव कोणीही तितकेच महत्त्वाचे असते. अशा विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याचे काम या मंगळवेढा तालुक्यातील अँड दत्तात्रय खडतरे हे करत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी खासदार पणेती शिंदे यांनीही दहावी-बारावीच्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व तसेच समाज उपयोगी उपक्रम सातत्याने राबवणाऱ्या अँड दत्तात्रय खडतरे यांचेही अभिनंदन केले. दहावी आणि बारावी विद्यार्थ्यांच्या जीवनातील अतिशय महत्त्वाचे महत्वाचा टप्पा असून पुढील संपूर्ण जीवनाची दिशा या टप्प्यावर ठरत असते. पूर्वी विद्यार्थ्यांसाठी कला वाणिज्य आणि विज्ञान असे मर्यादित पर्याय उपलब्ध होते. मात्र आता बदलत्या काळात नवीन नवीन अभ्यासक्रम आणि करिअरच्या संधी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी योग्य दिशा निवडून आपल्या ध्यान वर लक्ष केंद्रित केले पाहिजे आज सत्कार करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर यश संपादन केले असून हा सन्मान त्यांच्या मेहनीतीची पावती असल्याचे सांगितले.


यावेळी अँड दत्तात्रय खडतरे यांनी जर एखाद्या परीक्षेत विद्यार्थ्यांना अपयश आल्यास त्यांनी खचून न जाता जोमाने तयारी करून यशाच्या शिखरापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी कधीच मागे राहणार नाहीत.

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' राज्यव्यापी अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला असून या राज्यव्यापी अभियानाला एप्रिलपासून प्रारंभ करण्यात आला आहे.

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्राम पंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.




**सुदृढ गावांना मिळणार 'आरोग्यसंपन्न गाव' किताब**

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देऊन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**दोन ते पाच कोटींचे पुरस्कार**

राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणाऱ्या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुसऱ्या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत.

राज्यस्तरावर सर्वोत्तम ठरणाऱ्या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अधिक मासानिमित्त व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

## भाविकांना सुलभ व जलद दर्शन देण्यासाठी मंदिर प्रशासन सज्ज; दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अधिक मासानिमित्त चंद्रभागा स्नान व श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी भाविक लाखोंच्या संख्येने पंढरीत येत आहेत. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता दर्शन रांग व मंदिर परिसरात शेडनेट उभारुन सावली तयार करण्यात आली आहे. तर दर्शन रांगही वॉटरप्रूफ बनविण्यात आली आहे. यामुळे दर्शन रांगेत तासनतास थांबून भाविक दर्शन घेत आहेत. भाविकांना सुलभ, जलद व शांततेत दर्शन मिळावे म्हणून जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी मंदिर प्रशासनाला सुचना



दिल्या आहेत. त्यानुसार व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

अधिक मासानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे राज्यासह देशभरातून मोठ्या प्रमाणात भाविक दाखल होत आहेत. दि.१७ मे ते १५ जून या कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी दर्शन रांगेमध्ये मोठी गर्दी होत आहे. भाविकांना सुलभ, जलद व शांततेत दर्शन मिळावे यासाठी प्रशासनाने विविध उपाययोजना राबविल्या आहेत. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांनी शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनांनुसार दर्शन रांगांचे नियोजन काटेकोरपणे करण्याचे निर्देश पोलीस प्रशासन व मंदिर प्रशासनास दिले आहेत. कोणत्याही भाविकास अन्य मार्गाने किंवा नियमबाह्य पद्धतीने दर्शन देऊ नये, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. याच पार्श्वभूमीवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करणाऱ्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. काही इसमांकडून दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करून गोंधळ निर्माण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच व्हिआयपी दर्शनामूळे दर्शन रांगेतील भाविकांना वेळ लागत असल्याने तेही बंद करण्यात आले आहे.

दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करणारे, नियमांचे उल्लंघन करणारे अथवा भाविकांना त्रास देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्यात येतील. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती, पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांच्या समन्वयातून भाविकांना सुरक्षित, शिस्तबद्ध व सुलभ दर्शन मिळण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

**दर्शनाची वेळ पाहूनच रांगेत उभे रहावे**

आषाढी व कार्तिकी यात्रेप्रमाणे अधिक मास कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन २४ तास उपलब्ध नसते. अधिक मास कालावधीत दररोज सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत दर्शन व्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच दर्शन रांगेचे प्रवेशद्वार रात्री १०.०० वाजता बंद करण्यात येत आहे. रात्री १२.०० ते पहाटे ४.०० या कालावधीत श्रींची विश्रांती असते. तसेच पहाटे ४.०० ते ५.०० या वेळेत काकड आरती व नित्य पूजा होत असल्यामुळे या कालावधीत दर्शन बंद राहते.तथापि, दर्शन बंद झाल्यानंतरही अनेक भाविक दर्शन रांगेत उभे राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे भाविकांची गैरसोय होत आहे. पहाटे ५.०० वाजता पुन्हा दर्शनास सुरुवात होत असल्याने सर्व भाविकांनी दर्शनाच्या वेळेची माहिती घेऊनच दर्शन रांगेत प्रवेश करावा, असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी केले आहे.

# सहा. पंढरपूर पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या पथकाची अवैधरित्या वाळू उत्खननावर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २५/५/२०२६ रोजी पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोह/रोंगे, पोहा/हेंबाडे, पोलीस कॉन्स्टेबल हुलजंती व पोलीस नाईक शिंदे, यांनी बातमीदारांवर मिळालेल्या माहितीच्या आधारे आंबे येथे वाळू उत्खनन व वाहतुकीवर कारवाई केली.



मिळालेल्या माहितीनुसार संबंधित पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट दिली वैभव नागणे यांच्या वाळू रॅम्पवर दोन टिपर भरत असल्याचे निदर्शनास आले व सदर ठिकाणी शंभर बास वाळूचा साठा सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

कारवाईदरम्यान पोलीस पथकाने जेसीबी मशीन थांबवण्याचा प्रयत्न केला तसेच जेसीबी चालक यारी चालकासह पोलीस पथकास पाहून वाहनासह घटनास्थळावरून पळ काढला पोलिसांना घटनास्थळी मिळून आलेली वाहने ताब्यात घेतली असून त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) ट्रिपरBRO2G3189
चालक-गणेश गांडोळे
मालक-प्रकाश गायकवाड

२) टिपर क्रमांक उपलब्ध नाही

चालक-सिद्धू लाला कांबळे, घटनास्थळावरून पळून गेलेली जेसीबी चे मालक गणेश आजबे राहणार गोपाळकर असल्याचे निष्पन्न झाले आहे. संबंधित आरोपाचा शोध घेण्याचे काम सुरू असून उत्खनन वाहतुकीवर समजतावर कायदेशीर कारवाई होत आहे. सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस विभागामार्फत करण्यात येत आहे. अवैद्य वाळू उत्खनन व वाहतुकीच्या विरोधात पोलीस प्रशासनाकडून पुढील काळात ही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे इशारा देण्यात आला आहे.

# करकंब पोलिसांनी दुर्लक्ष केल्याच्या नातेवाईकांचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरवली येथील एका तरुणीवर दीड महिन्यापूर्वी अत्याचार करण्यात आला होता. त्यामुळे या तरुणांनी ११ एप्रिल रोजी आशीर्वाद आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. तिला पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. संतप्त नातेवाईकांनी या प्रकरणात आरोपीस अटक करावी, या मागणीसाठी करकंब पोलीस ठाण्यात तरुणीचा मृतदेह ठेवून आंदोलन केले.



तरुणीवर विविध ठिकाणी येऊन तिच्यावर अत्याचार त्याला त्यामुळे दाबून दिले होते. याप्रकरणी करकम पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तिने यानंतर आषाढी ठेवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र नातेवाईकांनी वेळीच केला पुणे येथील नंतर सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल केली गेले अनेक दिवस तिच्यावर उपचार सुरू होते. अखेर रविवारी इथे सोलापूर येथे तिचा मृत्यू झाला. मात्र पोलिसांनी या तरुणांना अटक केली नसल्यामुळे नातेवाईकांनी करकंब पोलीस ठाण्यासमोर तरुणीचा मृतदेह ठेवून आंदोलन केले. जोपर्यंत अटक करण्यात येणार नाही तोपर्यंत अंत्यसंस्कारा करण्यात येणार नाही अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली आहे. गावात काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची दखल घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकारी घेतली असून लवकरच आरोपीस अटक करण्यात येईल, अशी आश्वासन दिले आहे.

# मंगळवारपासून स्वा. सावरकर जयंती व्याख्यानमालेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : स्वातंत्र्यवीर सावरकर प्रेमी मंडळ, पंढरपूर संचलित सावरकर मुक्तद्वार वाचनालयाच्या वतीने स्वा. सावरकर जयंती व्याख्यानमाला २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. सावरकर पथ येथील 'स्वा. सावरकर क्रांतिमंदिर' मध्ये मंगळवार, दिनांक २६ ते २८ मे या कालावधीत दररोज सायंकाळी ठीक ६ वाजता व्याख्यान सुरू होईल. ३ दिवस चालणाऱ्या या व्याख्यानमालेत विविध क्षेत्रांतील दिग्गजांचे प्रबोधन पंढरपूरकरांना ऐकायला मिळणार आहे. व्याख्यानमालेच्या पहिल्या दिवशी मंगळवारी (२६ मे) प्रसिद्ध वाईल्ड लाईफ फोटोग्राफर सुनील उंबरे हे 'माझी फोटोग्राफी' या विषयावर आपले अनुभव मांडतील. दुसऱ्या दिवशी, बुधवारी (२७मे) अभय उत्पात यांचे 'संघ शताब्दी आणि पंचपरिवर्तन' या महत्त्वपूर्ण विषयावर व्याख्यान होईल. अंतिम दिवशी गुरुवारी (२८ मे) सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील स्वप्नील वाडदेकर हे 'नेटच्या युगात स्वसंरक्षण' या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्यानमाले व्यतिरिक्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून गुरुवार, दिनांक २८ मे रोजी सकाळी ८:३० वाजता स्वा. सावरकर यांच्या पुतळ्याचे पूजन अत्यंत उत्साहात करण्यात येणार आहे.

# उल्हासनगर महापालिका मुख्यालय येथे आपत्ती व्यवस्थापन निमित्त बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर /बाळासाहेब अहिरे :

आज दिनांक २२/०५/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता मान्सून पुर्व तयारी व त्या निमित्ताने करावयाच्या उपयोजना याबाबत उल्हासनगर महापालिका मुख्यालय येथे मिटिंग बोलण्यात आली होती.

सदर बैठकीस श्री. अजय साबळे, सहाय्यक आयुक्त १ व श्री विशाल कदम सहाय्यक आयुक्त २ तसेच महानगर गॅस लिमिटेड तर्फे श्री मयूर बोराडे मॅनेजर, श्री स्वप्निल मुंडे, डेप्युटी मॅनेजर, श्री नितीन पाटील असिस्टंट मॅनेजर आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ उल्हासनगर १ व उल्हासनगर २ तर्फे श्री प्रविण चकोळे कार्यकारी अभियंता, श्री प्रितम खेडकर अति कार्य अभियंता, राजेश स्वामी अति कार्य. अभियंता,दिलीप कुंभार अति कार्य. अभियंता हे अधिकारी उपस्थित होते.

सर्व अधिकारी कर्मचारी यांना मान्सून पुर्व तयारी व त्या निमित्ताने करावयाच्या उपयोजना करणेबाबत सूचना देण्यात आल्या. सर्व उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांची देखभाल दुरुस्ती व सुरक्षा प्रावधान विषयक कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणेबाबत मा. आयुक्त यांनी निर्देश दिले असल्याबाबत सूचित करण्यात आले. तसेच मान्सून पूर्व व मान्सून दरम्यान कामे करताना आणि सेवा देताना नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेणेबाबत निर्देशित करण्यात आले.

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७२ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नांना साकार करणे, हीच रमाईला खरी आदरांजली होय : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने रमाई स्मृतिदिनानिमित्त स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १७२ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे २४ मे २०२६ ला संपन्न झाली.



फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, रमाईला अभिवादन करताना आता केवळ अगरबत्ती लावून चालणार नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरच्या स्वप्नांना साकार करावे लागेल जेणेकरून रमाईच्या त्याग व समर्पणाला अर्थपूर्णतः प्राप्त होईल. ज्यांची ज्या ज्या ठिकाणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झालेली आहे, त्यांनी त्या त्या ठिकाणी आपआपल्या पदाला न्याय देण्याचे कार्य केले पाहिजे. मुद्दा कुठलाही असो मुद्द्याच्या दोन्ही बाजू तपासल्या पाहिजेत आणि सत्याच्या मार्गाने मार्गक्रमण केले पाहिजे. महिलाना जीवनाच्या सर्व क्षेत्रात समानता प्राप्त होण्यासाठी ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना या ग्रंथाचे आक्रमण केले पाहिजे. संयुक्त कुटुंब पद्धती कडून विभक्त कुटुंब पद्धतीकडे जाणाऱ्या समाजाला पुनश्च संयुक्त कुटुंब पद्धतीकडे वळविले पाहिजे. मानवी इगो अर्थात अहंकारामुळे कुटुंबासह समाजाचा मोठ्या प्रमाणात -हास होत चालला आहे. या अहंकाराची शस्त्रक्रिया करण्याची कोणतीही प्रक्रिया सध्या तरी उपलब्ध नाही म्हणून समाजाला अधोगतीपासून वाचवायचे असेल तर प्रत्येकाने अहंकार सोडावा लागेल त्यामुळे सुदृढ समाजाचे निर्मिती करता येईल. आई आपल्या आपण त्यांच्या अति प्रेमापोटी त्यांच्या चुकावर पांघरून घालत असल्यामुळे वर्तमानात कलेक्टरची मुले क्लर्क सुद्धा होताना दिसत नाहीत. अशावेळी विकासाच्या वल्गना करणारा समाज विनाशाकडे वाटचाल करीत आहे की काय? अशी उर्वरित समाजाची सद्यस्थिती बघून शंका येत आहे. करिता प्रत्येक कुटुंबाने आपल्या कौटुंबिक समस्या सोडविण्याकरिता फॅमिली संसद अमलात आणली पाहिजे. तसेच सामाजिक समस्या निर्मूलनासाठी सामाजिक सभागृहात सामाजिक संसदेची अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेल्या लोकशाहीची अंमलबजावणी करता येईल. या सर्व प्रक्रियेत महिलांना सहभागी करून घेऊ शकलो तर मग रमाईला आदरांजली अर्पण केल्यासारखे होईल. याचे मर्म समाजाला कळावे म्हणून सदरील विषयावर जाणीवपूर्वक कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना जमात इस्लामे हिंद च्या शहराध्यक्ष शाईस्ता कादरी म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दूरदृष्टी लक्षात घेऊन त्यांनी निर्माण केलेल्या भारतीय संविधानाची समाज जीवनात काटेकोरपने अंमलबजावणी केली तर स्त्रियासह संपूर्ण समाजाची प्रगती होऊ शकेल.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना डॉ. अनिल गायकवाड म्हणाले की, जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांना ५०% आरक्षण अर्थात प्रतिनिधित्व दिले पाहिजे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महिला विषयक शिक्षण, आर्थिक सशक्तिकरण, त्यांच्या शासन प्रशासनात सहभाग, स्वास्थ्य आणि सन्मान इत्यादी विषयावरील दृष्टिकोन समजून घेण्यासाठी चर्चासत्रे आयोजित केली पाहिजेत.

याप्रसंगी बोलताना समन्वयक विलास रामटेके म्हणाले की, महिला प्रतिनिधित्वाला प्राधान्य दिले पाहिजे. राहुल मेश्राम म्हणाले की, महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वसंरक्षणाचे धडे दिले पाहिजेत. सम्यक रामटेके म्हणाले की, पुरुषांच्या प्रगती मागे जसा महिलांचा हात असतो; तसाच महिलांच्या प्रगती मागे सुद्धा पुरुषांचाच हात असतो. डॉ. कल्पना गंगावणे म्हणाल्या की, अशा विषयावर चर्चा होणे ही काळाची गरज आहे. चंदा मगर मॅडम म्हणाल्या की, महिला मोठमोठ्या उच्च पदावर पोहोचल्या असल्या तरी निर्णय प्रक्रियेत नगण्य सहभाग असतो. सोहेल पटेल म्हणाले की, एकीकडे प्रधानमंत्री महिलांचा सन्मान केला पाहिजे म्हणत असताना दुसरीकडे बिलकिस बानूच्या बलात्काऱ्यांना तुरुंगातून सोडले जाने मुळीच संयुक्तिक नाही. मोहसीन सय्यद म्हणाले की, स्त्रियांच्या प्रगतीने देशाची प्रगती होऊ शकते. राज गायकवाड म्हणाले की, महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक ते नेतृत्व स्वीकारले पाहिजे. ॲड. सुनीलकुमार नागवंश म्हणाले की, स्वतः बुद्धाच्या विचाराचे पालन न करणारे इतरांना बुद्ध संदेश सांगत आहेत. डी. बी. मेश्राम म्हणाले की, कुठलेही ज्ञान ही एक माहिती असते, त्याचा कसा वापर केला जातो? यावर परिणाम अवलंबून असतात. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, स्त्रियांचे उद्धारक अनेक झाले असले तरी कैवारी मात्र एकच आहे, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, महिलांनी चळवळीत स्वतःचे अस्तित्व निर्माण केले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी शबाना शेख यांचीही विशेष उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. विलास कटारे तर सूत्रसंचालन उद्योजक शशिकांत काळे व आभार डॉ. जोगेंद्र पाचगावकर यांनी व्यक्त केले.

# जिल्ह्यातील पाच वर्षाखालील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये

## अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी; रविवार, २८ जून रोजी जिल्ह्यात पाच वर्षाखालील ४ लाख ३६ हजार बालकांचे लसीकरण होणार, ७ हजार २२२ मनुष्यबळाची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या कालावधीत ० ते ५ वयोगटातील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. कोल्ड चेन, वाहनांची सोय, जनजागृती प्रचार व प्रसिद्धी तसेच लोकांचा सहभाग यावर भर देऊन मोहिम यशस्वी करावी, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात राष्ट्रीय प्लस पोलिओ लसीकरण मोहीम जिल्हा समन्वय समितीची बैठक अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते.



जिल्ह्याच्या शहरी व गमीण भागातील प्रत्येक पाच वर्षाखालील बालकापर्यंत आरोग्य यंत्रणेने पोहोचून त्या बालकांचे लसीकरण करावे. यासाठी शहर व ग्राम स्तरावर शालेय विद्यार्थ्यांच्या प्रभातफेरीद्वारे जनजागृती करावी. आरोग्य यंत्रणे पुरेसे मनुष्बळाचे नियोजन करून ही मोहीम यशस्वी करावी त्यासाठी प्रत्येक वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा अशा सूचना श्री. निऱ्हाळी यांनी दिल्या.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी माहिति दिली की, दि. २८ जून २०२६ रोजी रविवारी सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येणार असून त्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज आहे. जिल्ह्यातील ५ वर्षाखालील ४,३६,५७२ बालकांना लस पाजण्यासाठी ग्रामीण भागात ५५७०, शहरी भागात ५७० व महानगरपालिका क्षेत्रात ३७३ लसीकरण बूथची सोय करण्यात आली आहे. मोहिमेसाठी ७२२२ कर्मचारी नियुक्त असून पर्यवेक्षणासाठी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

**राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम यशस्वी करण्याचे अपर जिल्हाधिकारी यांचे आवाहन**

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे यांनी सांगितले की, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, बाजारपेठ, विटभट्टी, साखर कारखाने, यात्रा व लग्न समारंभ अशा गर्दीच्या ठिकाणी पोलिओ डोस पाजण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. भटक्या वसाहती व उसतोड कामगारांच्या वसाहतीतील बालकांसाठी मोबाईल टीमची सोय करण्यात आली आहे.

या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मंजिरी कुलकर्णी, उपशिक्षणाधिकारी श्री प्रकाश नांगरे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्री धनंजय वाळा, जिल्हा सांख्यिकी अधिकारी श्री हेमंत पवार, परिचारिका सपना सोनवणे व साधना शिरसाट, वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. ओमकार येमुल, सहाय्यक प्राध्यापक डॉ. तिरुपती चोरमले तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# परीवर्तनचे मारुती बनसोडे यांना अंबरनाथ गौरव पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग ता.तुळजापूर चे संस्थापक सचिव तथा नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे धाराशिव जिल्हा संघटक आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्राप्त मारुती बनसोडे यांना यावर्षीचा दैनिक अंबरनाथ टाईम्स कडून दिला जाणारा अंबरनाथ गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आहे.

मारुती बनसोडे हे मूळचे बोरगाव ता. तुळजापूर येथील सामाजिक कार्यकर्ते आहेत गेली ३८ वर्षे सातत्याने सामाजिक कार्य करीत आहेत.डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या सोबत १० वर्षे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले आहे. त्यानंतर परिवर्तन सामाजिक संस्था बोरगाव ची स्थापना १९९६ मध्ये केली त्या संस्थेकडून गेली ३० वर्षे काम करीत आहेत. पोतराज प्रथा निर्मूलन, व्यसनमुक्ती, पर्यावरण, पाणी,ग्रामविकास, विधवा, निराधार,परित्यक्ता, एकल महिलांच्या प्रश्नावर ही ते काम करीत आहेत.त्यांच्या कार्याची दखल घेऊन दैनिक अंबरनाथ टाइम्स कडून दिला जाणारा सन २०२५ -२६ चा अंबरनाथ गौरवपुरस्कार जाहीर करण्यात आला होता.

सदर पुरस्कारचे वितरण दि.२३ मे २०२६ रोजी अंबरनाथ येथे एका मोठ्या कार्यक्रमात करण्यात आले. या प्रसंगी आमदार किशन शेट कथोरे ₹ज्यांच्या हस्ते तर दैनिक अंबरनाथ टाईम चे मुख्य संपादक कमलाकर सूर्यवंशी, कार्यकारी संपादक राजेंद्र सूर्यवंशी,उपसंपादक बालाजी सुर्यवंशी सह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मारुती बनसोडे हे मूळचे बोरगाव (तुपाचे) ता. तुळजापूर येथील सामाजिक कार्यकर्ते आहेत.गेली ३८ वर्षे सातत्याने सामाजिक कार्य करीत आहेत. डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या सोबत १० वर्षे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले आहे.त्यानंतर परिवर्तन सामाजिक संस्था बोरगाव ची स्थापना १९९६ मध्ये केली त्या संस्थेकडून गेली ३० वर्षे काम करीत आहेत.पोतराज प्रथा निर्मूलन,व्यसनमुक्ती,पर्यावरण, पाणी,ग्रामविकास, विधवा, निराधार,परित्यक्ता, एकल महिलांच्या प्रश्नावर ही ते काम करीत आहेत.त्यांच्या कार्याची दखल घेऊन दैनिक अंबरनाथ टाइम्स कडून दिला जाणारा सन २०२५ -२६ चा अंबरनाथ गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला होता.

सदर पुस्कारचे वितरण दि.२३ मे २०२६ रोजी अंबरनाथ येथे एका मोठ्या कार्यक्रमात करण्य़ात आले. या प्रसंगी आमदार किशन शेट कथोरे यांच्या हस्ते तर दैनिक अंबरनाथ टाईम चे मुख्य संपादक कमलाकर सूर्यवंशी, कार्यकारी संपादक राजेंद्र सूर्यवंशी, उपसंपादक बालाजी सुर्यवंशी सह मंचकावर उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त धनगर समाजाचा दहावा वधू-वर पालक परिचय मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर दिनांक २४ मे २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रविवार दिनांक २४ मे २०२४ सोलापूर मध्ये धनगर समाजाचा दहावा वधू वर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला होता. राजमाता सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने हा भव्य कार्यक्रम सुंदर मल्टीपर्पज हॉल, नेहरूनगर विजापूर रोड, सोलापूर येथे सकाळी दहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत पार पडला,

मेळाव्याचे उद्घाटन ओबीसी आंदोलनाचे नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वधू वर स्मरणिकेचे प्रकाशन ही प्राध्यापक लक्ष्मण नाके यांनी केले.

राजमाता सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक रवींद्र नागणेकरी अध्यक्ष सुहास गडदे उपाध्यक्ष श्रीकांत मिरगाळे सचिव सचिन लांडगे खजिनदार रामचंद्र धर्मशाली तसेच संचालक आणि २०२६ कार्याध्यक्ष उदय कुमार ठेंगिले उपाध्यक्ष आत्माराम देवडे सन्माननीय सदस्य भीमाशंकर काळे सुनील सलगर भाऊसाहेब चोरमुले सदाशिव हनुमाने सौ प्राध्यापक मुक्ता तरळगट्टी प्राध्यापक सौ वासंती पांढरे श्रीमती विमल सापटेकर अशोक नरोटे दिलावर शेख जितेंद्र गुरव इतर मान्यवर सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




कार्याध्यक्षपदी २०१७ साठी सुरेश बंदी छोडे यांची तर उपाध्यक्षपदी माणिकराव घोडके अक्कलकोट यांची निवड करण्यात आली पुढील मेळाव्याची तारीख ३०/ ५ /२०१७ रोजी निश्चित करण्यात आले

महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील धनगर समाजातील इच्छुक वधू-वरांना एकूण ६७८ परिचय पत्र पुस्तकाचे वितरण करण्यात आले पालकांची अंदाजे २२०० जून सहभागी होते अशी माहिती संयुक्तता संस्थापक रवींद्र नागरकेरी यांनी दिली.

# ज्ञानेश्वर भास्कर बोधले यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ज्ञानेश्वर भास्कर बोधले यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ३५ होते.

त्यांच्या पाश्चात आई,वडील पत्नी, एक मुलगा, दोन बहिणी असा परिवार आहे. त्यांच्यावर पंढरपूर येथील भूवैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापारी विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांचे मावस बंधू व पंढरपूर येथील तालुका वैद्यकीय अधिकारी एकनाथ बोधले यांचे बंधू होत. त्यांच्या निधनाने पंढरपूर आणि परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# झाडे जगवाचा नारा अन् लिंबाळ्यात सुरू झाडे तोडा.. मोहीम....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/ अमर जाधव : तालुक्यातील लिंबाळा (दा.) ग्रामपंचायतीच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर झालेल्या कथित बेकायदेशीर वृक्षतोडीमुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. गावातील वनिकरण क्षेत्रासह रस्त्याच्या कडेला असलेली तीनशेहून अधिक लहान-मोठी झाडे तोडण्यात आल्याचा आरोप होत असून, विशेष म्हणजे यासाठी वन विभागाची कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आलेली नसल्याची माहिती समोर आली आहे.


**तीनशेहून अधिक वृक्षांची कत्तल संतापजनक**

भूकंपानंतर हिंदुहृदयसम्राट स्व बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून पुनर्वसनासाठी दत्तक घेतलेल्या गावातील अनेक वर्षांपासून उभी असलेली झाडे एका झटक्यात जमिनदोस्त करण्यात आल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गावातील नागरिकांनी ही वृक्षतोड केवळ पर्यावरणाचा विनाश नसून शासनाच्या हरित महाराष्ट्र संकल्पनेलाच काळिमा फासणारी असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

दरम्यान, पंचायत समिती सदस्य अभिजित देशमुख यांनी या प्रकरणात आक्रमक भूमिका घेतली असून दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. झाडे वाचवण्यासाठी आवाज उठवणाऱ्यांवरच किल्लारी पोलिसांकडून गुन्हे दाखल होत असल्याचा आरोप त्यांनी केला. झाडे तोडणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी झाडे वाचवणाऱ्यांनाच लक्ष्य केले जात आहे, हा लोकशाहीला काळिमा फासणारा प्रकार आहे, असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला.

विशेष म्हणजे, आमदार अभिमन्यू पवार यांनी नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त फळबाग व वृक्षलागवडीसंदर्भात प्रशासनाची बैठक घेऊन शेकडो हेक्टरवर वृक्षलागवडीचे उद्दिष्ट दिले होते. मात्र त्यांच्याच मतदारसंघातील गावात अशाप्रकारे बेसुमार वृक्षतोड होत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**ग्रामपंचायतीकडून परवानगीशिवाय वृक्षतोड; वन विभागाच्या कारवाईचे संकेत, झाडे वाचवणाऱ्या सदस्यावरच गुन्हा दाखल**





वन विभागाच्या अधिकाऱ्यांनीही या वृक्षतोडीसाठी कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आलेली नाही. प्राथमिक माहिती गंभीर असून संबंधितांवर वन कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येतील, असे स्पष्ट संकेत दिले आहेत.

पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा आणि प्रत्यक्ष कृती यामधील दरी पुन्हा एकदा लिंबाळा प्रकरणामुळे समोर आली असून शासन, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

**परवानगीशिवाय वृक्षतोड कशी?**

ग्रामपंचायतीने वन विभागाची परवानगी न घेता शेकडो झाडे तोडल्याचा आरोप गंभीर मानला जात आहे.

**झाडे वाचवणाऱ्यांवरच गुन्हे?**

पर्यावरणासाठी आवाज उठवणाऱ्या पंचायत समिती सदस्यावरच पोलिस कारवाई झाल्याने संताप वाढला आहे.

**हरित महाराष्ट्र फक्त घोषणांत?**

एका बाजूला वृक्षलागवडीच्या बैठका आणि दुसऱ्या बाजूला बेसुमार वृक्षतोड, यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**वन विभागाची कारवाई होणार?**

वन विभागाने परवानगी नसल्याचे स्पष्ट करत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे संकेत दिले आहेत.

**रेल्वे विभागाचे दुर्लक्ष : २ वर्षापासून बोरवेल बंद, प्रवासी वैतागले**

**गोंदिया-चांदाफोर्ट पॅसेजर रेल्वे सुरु करण्याची प्रवाशांची मागणी**

# सुविधांचा अभाव, केरकचराची सजावट- स्वच्छतेची रेल्वे स्टेशन पाहते वाट... ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी : येथे अनेक वर्षांपासून रेल्वे स्थानक आहे, गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी सुविधा सुरळीत नाही. यामुळे या स्टेशनची फार दुर्दशा झाली असून, याकडे कुणी ढुंकूनही पाहत नाही. या स्टेशनची दशा आणि दिशा पार बदलूनच गेली असल्याने रेल्वे प्रशासनाला स्टेशन आवाज देत आहे. सुविधांचा अभाव, केरकचराची सजावट- स्वच्छतेची रेल्वे स्टेशन पाहते वाट... ? असी बाराभाटी रेल्वे स्टेशन अशी आर्त हाक करीत आहे.







बाराभाटी रेल्वे स्टेशन हे गोंदिया व चांदाफोर्ट या रेल्वे मार्गावर आहे. या ठिकाणाहून अनेक सामान्य नागरिक, शासकीय-निमशासकीय अधिकारी- कर्मचारी, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, व्यावसायिक, प्रशिक्षणार्थी प्रवास करीत होते, पण रेल्वे बंद असण्याच्या कारणाने पॅसेंजर दुरावली आणि प्रवासीही हरविल्याचे चित्र आहे. या स्टेशनवर रेल्वे सुरू झाली, तेव्हापासून तर आजही महिलांसाठी प्रसाधनगृह नाही, त्यामुळे त्यांची कुचंबना होते. पिण्याच्या पाण्याचे नळ नाहीत, उभे राहायला व बसायला साजेसे छत नाही, अजूनही स्टेशन परिसरात पूर्ण विद्युतीकरण नाही. मात्र, याकडे विभागाचे दुर्लक्ष झाले आहे.

**बोरवेल बंद**

या रेल्वे स्टेशनवर दोन वर्षापासून बोरवेल बंद आहे. गढूळ पाणी येतो. ती बोरवेल दुरुस्ती करण्यात आले नाही. हा प्रवाशांच्या जीवाचा खेळ आहे.

**केरकचरा सजावट**

सदर रेल्वे स्टेशनवर हिरवा कचरा हा एक वर्षापासून कापण्यात आला नाही. स्वच्छ केला नाही. महिलांना लघु विश्रांती करता येत नाही. अशा अनेक आवश्यक बांबीनी हे स्टेशन हिरमोड झाले आहे. स्वच्छता करण्याची वाट पाहत आहे.

**विद्युत पुरवठा परिपूर्ण नाही.**

संपूर्ण स्टेशनवर विज पुरवठा करण्यात आला नाही. काही स्टेशनवरील विद्युत खांब बंद आहेत. प्रतिक्षालयात विज नाही. लावायला दरवाजा नाही.

महामंडळाच्या एसटीने तर गरिबांचे तिकीट वाढविल्यामुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे या मार्गावरील गोंदिया-चांदाफोर्ट ही पॅसेंजर गाडी सुरू करण्याची मागणी येरंडी, देवलगाव, बाराभाटी कुंभीटोला, बोळदे, कवठा, डोंगरगाव, सुकळी, खैरी, पिंपळगाव खांबी, ब्राह्मणटोला, चापटी येथील प्रवाशांनी केली आहे.